# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

(सायंकाळ)

दिनांक २८.१०.२०२६ बुधवार

(कामगिरी)

**१) कळमना पोलीसांची कामगिरी :– गांजा बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २७.१०.२०२६ चे २३.४५ वा. ते २८.१०.२०२६ चे ०२.२२ वा. चे दरम्यान, कळमना पोलीसांचे पथक हे पेट्रोलिंग करीत असता, पोलीस ठाणे कळमना हद्दीत चिखली पुलाखाली आरटीओ कार्यालयाजवळ रोडचे कडेला एक इसम अंधारात खांद्यावर कॉलेज बॅग व हातात एक प्लॉस्टीक बोरी घेवून संशयीतरित्या दिसल्याने पंचासमक्ष त्यास नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव आकाश अशोक श्रीवास वय ३३ वर्ष रा. मिनीमातानगर, गल्ली नं. ११, आर.के. सायकलजवळ, कळमना असे सांगीतले. त्याचे जवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरून एनडीपीएस कायद्याचे तंतोतंत पालन करून त्याची झडती घेतली असता, त्याचेजवळील प्लॅस्टीक बोरीमध्ये एकुण ४ किलो ९४७ ग्रॅम हिरव्या रंगाचा अंमली पदार्थ गांजा मिळुन आला. आरोपीचे ताब्यातुन गांजा, एक मोबाईल फोन, रोख ६१०/– रू. असा एकुण १,३६,१६०/– रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने जप्त करण्यात आला. आरोपीस अधिक विचारपूस केली असता, त्याने नमुद गांजा हा त्याचा साथीदार पाहीजे आरोपी यश उर्फे विजु बेमाल रा. केसींगा, कंटाबांजी, उडीसा याचेकडून आणल्याचे सांगितले. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता गांजा विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीचे कृत्य हे कलम ८(क), २०(ब), 11(ब) एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे कळमना येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. एका आरोपीस अटक करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. नित्यानंद झा पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ५), मा. श्री. रोहित ओव्हाळ सहा. पोलीस आयुक्त (कळमना विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. प्रविण काळे, दुपोनि. करिम पठाण, पोउपनि गजानन राऊत, पोहवा. प्रमोद कंगाले, विशाल भैसारे, पोअं. अविनाश ग्वालवंशी, रोशन निंबरते व नितीन मिश्रा यांनी केली.

**२) आर्थिक गुन्हेशाखा, पोलीसांची कामगिरी :– बनावट सोन्याचे तारणावर कोट्यावधीचे गोल्ड लोनद्वारे फसवणुक प्रकरणातील पाहीजे आरोपीस अटक.**

ICICI बॅकेच्या गोल्ड लोन प्रक्रियेमध्ये अनियमितता करून बनावट कर्जदारांच्या नावाने गोल्ड लोन मंजुर करणे, तारण ठेवलेल्या सोन्याचा शुध्दता व वजनाबाबत गैरप्रकार करणे तसेच कर्जाच्या रकमांचा गैरवापर केल्याचे गंभीर प्रकरणी पोलीस ठाणे धंतोली येथे दिनांक ३०.३.२०२६ रोजी अप. क्रमांक ६३/२०२६ दाखल करण्यात आला होता. दिलेल्या तक्रारीनुसार बॅकेचे रू. २३,१९,४१,७५१/– इतके आर्थिक नुकसान झाल्याचे नमुद करण्यात आले होते.

फसवणुकीची पध्दत :–

सन २०१८ ते २०१९ मध्ये मुख्य आरोपी सचिन राऊत याने ICICI बॅकेमध्ये स्वताचे नावे गोल्ड लोन केले. त्यानंतर बॅकेमध्ये स्वत:ची क्रेडीट वाढविले. बॅक मॅनेजर यांना दिलेले गोल्ड लोनचे टारगेट हे पुर्ण करायचे होते. सचिन राउत हा भंगारचा व्यवसाय करत होता. त्याचे लेबरचे नावाने बॅक मॅनेजरचे माध्यमातुन गोल्डलोन करण्यात आले त्यानंतर बॅक मॅनेजर नामे पंकज केकतपुरे, दिनेश नागपुरे, आशिष वंजारी, उप व्यवस्थापक प्रकाश अवस्थी यांनी मुख्य आरोपी सचिन राउत यांना गोल्ड लोन देण्यासाठी विविध शाखेमधील असलेले मॅनेजर यांनी मदत केली आहे. अप्रेझर/व्हॅल्युअर नंदु खरवडे यांची नियुक्ती ही आयसीआयसीआय बॅकेच्या ४ शाखेत नियुक्त असतानाही त्याला इतर शाखेत पाठवुन बनावट गोल्डचे व्हॅल्युएशन करण्यात आले आहे. अप्रेझर/व्हॅल्युअर नंदु खरवडे यांनी एकुण १५५ बनावट सोन्याचा दागिन्याचे व्हॅल्युवेशन केले आहे. त्या मोबदल्यात नंदु खरवडे यास प्रत्येक अहवाल देण्यासाठी ५०००/–रू. हे पंकज केकतपुरे हा देत होता. नंदु खरवडे यांने आपले ओळखीचे, मित्र, नातेवाईक असे एकुण ३८ बनावट गोल्ड लोन ग्राहक बॅकेला दिलेले आहेत. गोल्ड लोन प्रकिया पुर्ण झाल्यावर ऑडीटर यांचेकडुन ३ महिन्यानंतर ऑडीट होत असते त्यात प्रमोद टेटे, राजेंद्र शिलनकर, धनंजय ढोमने तिघेही ऑडीटर असुन यांना बनावट सोन्याचे दागिने हे शुध्द सोन्याचे आहे असा अहवाल देण्यास सांगुन त्या मोबदल्यात त्यांना पैसे देण्यात आले. अशाप्रकारे बॅकेतील सर्व यंत्रणेने बनावट ग्राहक यांना तयार करुन फौजदारी कट करुन गुन्हा केलेला होता.

गुन्ह्याचा तपास आर्थिक गुन्हेशाखा, नागपुर शहर यांनी करून, गुन्ह्यामध्ये एकुण ९ आरोपींना यापुर्वी अटक केलेली होती. गुन्ह्यातील पाहीजे आरोपी नामे प्रफुल्ल अशोक चौधरी, वय ३९ वर्षे, रा. प्लॉट नं. ७७७, तेलंगखेडी हनुमान मंदीर जवळ, रामनगर, नागपुर, ह.मु– फ्लॅट नं. २०१, रघुकुल अपार्टमेंट, तेलंगखेडी, नागपुर यास आज रोजी बॅक गोल्ड लोन घोटाळ्यात अटक केली आहे. आरोपीस मा. न्यायालयासमक्ष हजर करून, त्याची दिनांक ३०.१०.२०२६ पावेतो पोलीस कोठडी प्राप्त केलेली आहे. आतापावेतो एकुण १० आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. गुन्ह्याचा तपास मा. श्री. दीपक अग्रवाल पोलीस उपायुक्त गुन्हेशाखा यांचे मार्गदर्शखाली सुरू आहे.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे यशोधरानगर :–शस्त्र बाळणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २८.१०.२०२६ चे ००.५५ वा. चे सुमारास, यशोधरानगर पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना, नागसेनवन, पाण्याचे टाकीजवळ, नागपूर येथे एक इसम संशयास्पदरितीने दिसल्याने, त्याचेजवळ जात असता, तो पोलीसांना पाहुन पळू लागला. त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात

घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव विक्की संजय मोरे वय २५ वर्षे, रा. गल्ली नं. २५, गांधीपुतळाजवळ, विनोबा भावे नगर, नागपुर असे सांगीतले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात एक लोखंडी धारदार चाकु किंमती ५००/—रू. चा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला.

आरोपी हा कोणतातरी दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने धारदार चाकु बाळगतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे फिर्यादी पोअं. लक्ष्मण पडवाल यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे यशोधरानगर येथे पोउपनि तानाजी धावने यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे बेलतरोडी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक २७.१०.२०२६ चे १२.३० वा. ते १९.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत प्लॉट नं. ६३, अमर संजय सोसायटी नं. ३, आस्वाद हॉटेल जवळ, मनिषनगर, नागपूर येथे राहणारे फिर्यादी नरेश रामजी लाडे, वय ५४ वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह कॅन्सर इन्स्टीट्युट, जबलपुर हायवे रोड, नागपुर येथे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन, घराचे आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख १,७०,०००/—रू. तसेच, सोन्याचे वेगवेगळे दागिने व मोबाईल फोन असा एकुण किंमती ७,१५,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि. शिरीष सलगर ९६७३९९१४०७ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ), ३३१(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसींग)**

**पोलीस ठाणे जरीपटका :—** फिर्यादी सविता सुरेंद्र बाम्बोळकर, वय ५४ वर्षे, रा. प्लॉट क्र. ६३१, कुशी नगर, जरीपटका, नागपूर यांनी पोलीस ठाण जरीपटका येथे तक्रार दिली की, त्यांची मुलगी नामे मृणाली सुरेंद्र बाम्बोळकर, वय २३ वर्षे ही दिनांक २७.१०.२०२६ चे ०८.३० वा. पासुन पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरून बेपत्ता झाली आहे. शोध घेतला असता, मिळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने तीला फुस लावून पळवून नेले असावे. अशा फिर्यादीचे तक्रारीवरुन पोलीस ठाणे जरीपटका येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम १४०(३) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. **बेपत्ता व्यक्तीचे वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—मजबुत, उंची—५ फुट १ इंच, केस—काळे लांब, अंगात— गुलाबी रंगाचा कुर्ता व प्लाझो घातलेले आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलते.



मृणाली

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**

## वाहतुक शाखेची प्रेसनोट

वाहतूक परिमंडळ सदर अंतर्गत नागपूर सुधार प्रन्यास, उत्तर, नागपूर तर्फे मे. डी. के. एच लेंडे कडुन मौजा झिंगाबाई टाकळी येथे शिव किराणा ते महालक्ष्मी लॉन पर्यंत सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम १० महिन्यात करण्यात येणार आहे. करीता नमुद कार्यक्रम दरम्यान वाहतूकीचे नियमन व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. रस्त्यावर वाहतूकीची कोंडी निर्माण होवू नये तसेच, रोडवर गंभीर व प्राणांतिक अपघात होवू नयेत, अपघातावर प्रतिबंध व्हावा. यासाठी वाहतूक वळविणे आवश्यक आहे. करीता या दरम्यान रोडवर वाहतूकीचे दृष्टीकोनातुन वाहतुक वळविण्याबाबत खालील प्रमाणे अधिसुचना निर्गमित करण्यात आली आहे.

**शिव किराणा ते महालक्ष्मी लॉन तसेच महालक्ष्मी लॉन ते शिव किराणा कडे जाणारी संपूर्ण वाहतूक खालील प्रमाणे वळविण्यात येत आहे.**

- शिव किराणा ते महालक्ष्मी लॉन कडे जाणारी संपूर्ण वाहतूक टावर लाईन रोड येथुन डावे वळण घेऊन जुना मानकापूर पोलीस ठाणे मार्गे महालक्ष्मी लॉन कडे सोयीनुसार जातील.
- महालक्ष्मी लॉन कडुन शिव किराणा कडे जाणारी संपूर्ण वाहतूक जुना मानकापूर पोलीस ठाणे मार्गे टावर लाईन रोड येथुन उजवे वळण घेऊन शिव किराणा कडे सोयीनुसार जातील.

**सदर अधिसूचना दिनांक २९.१०.२०२६ ते दिनांक २८.११.२०२६ पर्यत अंमलात राहील.**

नागपूर शहरातील सर्व वाहन चालकांनी वरील कार्यक्रमाचे वेळेनुसार आपल्या प्रवासाचे नियोजन करून आपली होणारी गैरसोय टाळावी व वाहतूक पोलीसांना सहकार्य करावे.

**स्वा/—**
**(आदित्य मिरखेलकर, भापोसे)**
पोलीस उप आयुक्त,वाहतुक,
नागपूर शहर